निशाणी क्र. ५०

**दोषारोप निश्चीती पुर्वीचा पुरावा**

**फिर्यादी तर्फे साक्षीदार क्र. ५ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – दादा लिंबराज कांबळे

वय – ४५ वर्षे, व्यवसाय– नोकरी

पत्ता – आवंती नगर, लातूर ता. लातूर व जि.लातूर.

**फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास विधीज्ञ श्री. जी. आर. सांळुके यांचे मार्फत सुरुः–**

१. फिर्यादी व आरोपींना मी ओळखतो. सन २०२० साली मी शेती विमा प्रतिनीधी म्हणूण तालूका निलंगा येथे काम करत होतो. फिर्यादी माझ्याकडे दिनांक १५/०६/२०२० रोजी माझ्याकडे चौकशी करण्याकरीता आला होता. त्याची विकविमा रक्कम मिळाली नाही म्हणून ते माझ्याकडे आले होते. मी सांगीतल्या प्रमाणे फिर्यादी दिनांक १६/०६/२०२० रोजी कागदपत्रे घेवून माझ्याकडे आले होते. मी त्यांच्याकडून अर्ज घेतला होता. आबाजी खोमने यांच्या मोबाईलवरुन संतोष कोरके यांना फोन करुन सदर अर्जाबाबत सांगीतले होते. तेंव्हा संतोष कोरके यांनी मी त्यांचा विमा भरलेला आहे कंपीनीतून काहीतरी झाले असावे असे म्हणाले. संतोष कोरके ऑनलाईन पिकवीमा अर्ज करणे इत्यादी कामे करत असतो. त्याकरीता तो महाईसेवा केंद्र चालवतो. मधुकर खोमणे माझ्याकडे आधारकार्ड, पिकवीमा भरल्याची पावती, बँक पासबूक, पॅनकार्ड घेवून आले होते. त्याने दाखवलेल्या पावती प्रमाणे त्यांना त्यांचा विमा मिळाला नव्हता. संताष कोरके यांनी त्यांना विमा भरण्याची पावती दिल्याचे मला फिर्यादीने सांगीतले होते. मी फिर्यादीचा अर्ज अॅग्रीकल्चरल ईन्शूरन्स कंपनी लातूर या कार्यालयाकडे पाठवला होता.

**उलटतपास आरोपीच्या विधीज्ञांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर सबब उलटतपास नाही.**

**फेरतपास पुर्ण. उलटतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI Date: 2025.11.20 13:03:54 +0530

**(श्रीमती.ए.एस.गुंजवटे)**

दिनांक १५/११/२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१, निलंगा